(७२)

महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ३९९१ दि.- १६/१०/१८

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक - १५/१०/२०१८ दिनांक - दुपारी ०३.३० वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

| | |
|---|---|
| **श्री.प्रदिप रघुनाथ दरेकर**<br>गंगाधाम फेज-१, बिल्डींग नं.ए-१,<br>फ्लॅट नं.३०१, बिबवेवाडी-कोंढवा रोड,<br>मार्केट यार्ड, पुणे ४११०३७. | अपिलार्थी |
| **श्री. श्यामला हावरे**<br>महापालिका सहाय्यक आयुक्त<br>बिबवेवाडी कार्यालय,<br>पुणे महानगरपालिका. | जनमाहिती अधिकारी तथा<br>अधिक्षक |

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री.प्रदिप रघुनाथ दरेकर (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक ३०/०७/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक ३०/०७/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी स.नं.६१५, गंगाधाम कोलोडीयम फेज-२, गंगाधाम फेज-१ जवळ, मार्केट यार्ड, पुणे-३७ व सुर्या हाउस, प्लॉट नं.२, गंगाधाम, मार्केट यार्ड हिल्स, पुणे -३७ याठिकाणी असलेल्या जहिरात फलकाबाबतची माहिती विचारलेली होती

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| ३०/०७/२०१८ | ३०/०७/२०१८ | ३०/०८/२०१८ | ०९/०८/२०१८ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती अपुरी दिली असल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक १७/०९/२०१८ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| **अपिल अर्जाचा दिनांक** | **अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| १७/०९/२०१८ | १७/०९/२०१८ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.१५/१०/२०१८ रोजी दुपारी ०३.३० वा.

सुनावणीस अपिलकर्ता - अनुपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी व सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| क्र. | दिलेल्या माहितीचा तपशील |
|---|---|
| मुद्दा क्र.१ | साईज २०'X १०'-१ बोर्ड, ४'X ३'-१ बोर्ड |
| मुद्दा क्र.२ | पाठोपाठ परवानगी दिली जाते. |
| मुद्दा क्र.३ | रू.२२२/- १ चौ.फुट १) १२०'X १०' = २०० चौ.फुट र.रू.४४४००/-<br>२) ४'X ३' = १२ चौ.फुट र.रू.२६६४/- |
| मुद्दा क्र.४ | सदर बोर्डसाठी कालावधी १ वर्ष श्री.पानसरे दत्तात्रय मोतीराम (साई इस्टेट) |

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.प्रदिप रघुनाथ दरेकर हे अनुपस्थित होते. सदर दिनांकास श्रीमती शामला हावरे, जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका या उपस्थित होत्या. तसेच श्री.सचिन खेडकर, सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा परवाना व आकाशचिन्ह निरिक्षक हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.प्रदिप रघुनाथ दरेकर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जातील स.नं.६१५, गंगाधाम कोलोडीयम फेज-२, गंगाधाम फेज-१ जवळ, मार्केट यार्ड, पुणे-३७ व सुर्या हाउस, प्लॉट नं.२, गंगाधाम, मार्केट यार्ड हिल्स, पुणे -३७ यापैकी फक्त स.नं.६१५, गंगाधाम कोलोडीयम फेज-२, गंगाधाम फेज-१ जवळ, मार्केट यार्ड, पुणे-३७ येथील जहिरात फलकाची माहिती मिळाली असून विचारलेल्या माहितीपैकी उर्वरित जहिरात फलकाची माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आह

<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>

- जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जात व अपिल अर्जात नमूद केल्यानुसार सुर्या हाउस, प्लॉट नं.२, गंगाधाम, मार्केट यार्ड हिल्स, पुणे -३७ याठिकाणी असलेल्या जहिरात फलकाची अपिलार्थी यांनी मागविलेली महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालयाकडे सद्यस्थितीत उपलब्ध असणारी माहिती पुढिल ८ दिवसात अपिलार्थी श्री.प्रदिप रघुनाथ दरेकर यांना उपलब्ध करून देणेत यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जाची परिपूर्ण स्वरूपातील माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

16-10-18

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

टिप -

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे - ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत -

१. श्री.प्रदिप रघुनाथ दरेकर, गंगाधाम फेज-१, बिल्डींग नं.ए-१, फ्लॅट नं.३०१, बिबवेवाडी कोंढवा रोड, मार्केट यार्ड, पुणे- ४११०३७.
२. श्रीमती श्यामला हावरे, जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. श्री.सचिन खेडकर, सहा.जनमाहिती अधिकारी तथा परवाना व आकाशचिन्ह निरिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.